# गजानन – गुंजन

## श्री दत्त जयंती - डिसेंबर २०२१



gajanangunjan@gmail.com

For free circulation only

।। श्री दत्त स्तुती ।। ........ 3
डॉ. पंकजा शुक्ल, भोपाळ ........ 3
**Shree Gajanan Maharaj Murti Pran Pratishtha in Boston, USA** ........ 4
बोस्टन गजानन महाराज परिवार ........ 4
शिकॅगो कालीबारी, श्री गजानन महाराज  भक्त  संमेलन ........ 5
शिकॅगो कालीबारी  स्वयंसेवक ........ 5
परिस ........ 8
सौ. आरती देशपांडे पुणे ........ 8
आर्ततेने गावे, ध्यान धरावे दत्तप्रभुचे ........ 9
माधुरी ब्रह्मे-देशपांडे,  विदर्भ ........ 9
गुरुपौर्णिमा virtual उत्सव ........ 12
श्री गजानन महाराज भक्त परिवार, USA ........ 12
मागणे ........ 13
सौ श्रावणी सामंत, बोरिवली, मुंबई ........ 13
**Kids Quiz** ........ 14
**Veena, Seattle.** ........ 14
भावभक्ती शिवाय सद्गुरू काही मागत नाही ........ 15
सौ. अपर्णा जोशी,  पुणे ........ 15
श्री नवनाथ स्तवन ........ 17
रोहन मेहता, सियाटल ........ 17
।। श्री गुरूंचे गाणे ।। ........ 17
कै. निर्मला देशपांडे ........ 17
संकलन: सुमेधा जोशी (नात) ........ 17

|| ॐ गं गणपतये नमः ||

|| श्री गजानन जय गजानन ||



For free circulation

# ।। श्री दत्त स्तुती ।।

डॉ. पंकजा शुक्ल, भोपाळ

दत्त माउली द्या दर्शन मज दत्त माउली द्या दर्शन।

अत्रिसुता अनुसुया नंदन जीवन दाता करुणाघन॥

दत्त माउली द्या दर्शन...

ब्रम्हा विष्णु शिवरूप त्रिमूर्ती

पालक पोषक नाशक शक्ति।

जटा जूट धारी पिंगाक्षी,

परमेश्वर हा सर्वसाक्षी ।। १ ।।

दत्त माउली द्या दर्शन...

गाणगापूर चा तू अवधूत

ठाव न लागे पिशाच अन् भूत।

जगद्‌गुरु तुजला वंदन

हृदयी असावे नामस्मरण ।। २।।

दत्त माउली द्या दर्शन...

शुद्ध चतुर्दश मार्गशीर्ष

अवतरला हरण्या भवभीत।

कुंद इंदु सम रूप मनोहर

मुदमंगल दाता जगदीश्वर ।। ३।।

दत्त माउली द्या दर्शन...

गिरनार, माहुर, कारंजा,

संगम भीमा अमरजा।

सूक्ष्म रूप विचरणकर्ता

भक्तांचा कैवल्यदाता ।। ४।।

दत्त माउली द्या दर्शन...

दत्त दिगंबर श्रीपाद वल्लभ,

नरसिंह सरस्वती सर्वांना सुलभ।

स्वामी समर्थ, गजानन माउली,

संप्रदाय हा पुढती चालवी ।। ५।।

दत्त माउली द्या दर्शन...

चरणी दृढ निष्ठा ठेवा,

मिळो आम्हा तुझिया सेवा।

अत्रिसुता अनुसुया नंदन

जीवनदाता करुणाघन ।। ६ ।।

दत्त माउली द्या दर्शन मज दत्त माउली द्या दर्शन।

।। श्री गजानन जय गजानन ।।



For free circulation

## Shree Gajanan Maharaj Murti Pran Pratishtha in Boston, USA

### बोस्टन गजानन महाराज परिवार



On the September 11th, 2021, auspicious Rishipanchami day, 111th Samadhi year of Shree Gajanan Maharaj, Maharaj murti pran pratishtha puja of full-size Maharaj murti was performed in the Boston area. Shri Dwarkamai Sai Baba Temple in the Boston area graciously welcomed the first full size murti of Shree Gajanan Maharaj. The Pran Pratishtha puja was performed with full rituals to Maharaj by starting with Ganesh Puja, Punyavachanam, Navagraha shanti puja, Pran Pratishta puja rituals, Abhishek followed by Aarti/Prasad. Many devotees in the Boston area attended this milestone program with great excitement and devotion.



The murti currently resides in a private place in the Lexington, MA area due to limited podium space in the Dwarkamai Sai Baba temple, Billerica, MA. As more space will be available to the temple, the Murty will be moved inside the temple area very soon.

The Gajanan Maharaj Boston group has been celebrating Maharaj events like Prakat din, Gudi Padwa, Samadhi diwas, Datta Jayanti and offers monthly upasana/bhajans since the year 2016. If anyone wishes to join Maharaj events/darshan in the area, please email
ShriGajanan@Dwarkamai.com or
call (339) 234-6128 or
Visit:
https://www.facebook.com/ShriGajananSevaBoston

Current darshan timings are given below,
Thursdays, 6:30pm - 9pm darshan,
7pm- Abhishek, 7:30pm Aarti
Other weekday evening/weekends darshan by rsvp at above contact information.

|| श्री गजानन जय गजानन ||

# शिकॅगो कालीबारी, श्री गजानन महाराज भक्त संमेलन

शिकॅगो कालीबारी स्वयंसेवक



ढोल ताशा पथक उत्साहात ढोल बडवताहेत. आजूबाजूला पाच सहाशेचा जमाव जमला आहे. ट्रॅफिक पोलीसांना पूर्व सूचना असल्यामुळे पोलीस बंदोबस्त आहे. बरेचसे अमेरिकन नागरिक हा सर्व सोहळा कौतुकाने न्याहाळत आहेत. श्री गजानन! जय गजानन! गजानन महाराज की जय!, असा नामघोष होतो आहे. सर्व वातावरण अगदी गजाननमय होऊन गेलं आहे.

हे वर्णन आहे नुकतेच अमेरिकेत शिकॅगो येथे संपन्न झालेल्या गजानन महाराज भक्त संमेलनातील एका प्रसंगाचे.

शिकॅगो, अमेरिका येथे डॉ. श्री राम चक्रवर्ती यांचं 'काली बारी' मंदिर आहे. मंदिर विस्तीर्ण जागेत पसरलं आहे. मंदिरात काली माते सोबत साईबाबा, गजानन महाराजांच्या मोठ्या मूर्त्या स्थानापन्न आहेत. तसेच अन्य देवही तेथे विराजमान आहेत.

शिकॅगो येथील या मंदिरात कोलकत्ता येथून नेण्यात आलेली गजानन महाराजांची मूर्ती आहे तसंच मुंबई येथील एक भाविक गजानन महाराज भक्ताने भेट दिलेली महाराजांची मूर्ती आहे. मात्र हे येथील खूपशा भक्तांना माहिती नव्हतं. मंदिरात गजानन महाराज स्थापित आहेत, हे आसपासच्या भक्तांना कळावं, तिथे गजानन महाराज भक्तांनी एकत्र जमावं. त्या निमित्ताने अमेरिकेत एक गजानन महाराज भक्त संमेलन आयोजित करावं. असा विचार स्थानिक कार्यकर्त्यांच्या मनात आला. अर्थात याचं बीज दोन तीन वर्षांपूर्वी शिकॅगोहून शेगांव दर्शनासाठी आलेल्या एका कार्यकर्त्यांने पारायण मंडपाच्या मागे महाराजांच्या काळातील औदुंबर वृक्षाच्या खोडाजवळलील माती अत्यंत श्रध्देने आपल्या कपाळी लावली तेव्हा त्या शेगांवच्या मातीत रुजलं होतं.

कार्यकर्त्यांच्या या विचाराला राम चक्रवर्ती यांचा भरघोस पाठिंबा मिळाला आणि अमेरिकेत संपन्न झालं ' गजानन महाराज भक्त संमेलन '

गजानन महाराजांचा आशिर्वाद घेऊन प्रयत्न केल्यावर कार्यक्रमाचं यश ठरलेलंच! कार्यक्रमाची पूर्व तयारी म्हणून शेगांवहून गजानन महाराजांच्या एकशे एकवीस पितळी मूर्त्या नेण्यात आल्या. त्या मूर्त्या भक्तांना देताना खरोखरच महाराजांचं करणार आहेत याची शहानिशा करून मूर्ती भक्तांना देण्यात आली. संमेलनात काही मूर्त्यांवर प्रत्यक्ष कार्यक्रम स्थळी तर

काही मूर्त्यांवर भक्तांच्या घरी अभिषेक करण्यात आला. वेगवेगळ्या शहरातून, राज्यातून सहाशे भक्त संमेलनात सहभागी झाले होते.

दि.१७ सप्टेंबरला संध्याकाळी श्री राम चक्रवर्ती आणि सौ लीना चक्रवर्ती यांच्या कडून दीपप्रज्वलन करून संमेलनाचा शुभारंभ झाला. सर्व प्रथम काली मातेची ओटी भरण्यात आली. तिथे उपस्थित भक्तांना आनंद देणारी गोष्ट म्हणजे दीपप्रज्वलन होताच सुरू झालेला पाऊस. जणू भगवंताचा कृपावर्षाव. गजानन स्तवन होऊन भक्तीगीत, भजन आदी कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं. १७, १८ व १९ सप्टेंबर रोजी झालेल्या या संमेलनात कार्यक्रमाची रेलचेल होती. वक्ते दूरदेशी असल्यामुळे, प्रामुख्याने सर्व उद्बोधन ऑनलाईनच झालं असं म्हणायला हरकत नाही. काही ठळक कार्यक्रम आपण येथे नमूद करू...



सौ मेघना अभ्यंकर, मुंबई. यांचं 'गजाननमय प्रेममूर्ती श्री नांदेडकर गुरुजी' या शीर्षकाचं सुंदर पुस्तक आहे. हे पुस्तक शेगांवला ज्यांना सातत्याने चाळीस वर्षे समाधी मंदिरात पूजा करण्याचं भाग्य लाभलं त्या आदरणीय नांदेडकर गुरूजींवर लिहीले आहे. त्या पुस्तकाच्या इंग्लिश आवृत्तीचं (An Epitome of divine Love shri Nandekar Guruji) विमोचन संमेलनात करण्यात आलं. (या ठिकाणी आणखी एका गजानन महाराजांवरील इंग्लिश पुस्तकाचा उल्लेख करायलाच हवा. श्री नितीन गोकर्ण याचं 'ओशन ऑफ मर्सी'! यांनीही संमेलनाला शुभेच्छा दिल्या.) सौ मेघना अभ्यंकर यांचं 'जो माझा असेल त्याचेच कार्य होईल' या विषयावर उद्बोधनही झालं. सौ. मंदाकिनी पाटील यांनी भक्तांसमोर 'संजीवन समाधी' या विषयावर व्याख्यान दिलं. तर ज्योत्स्नाताई मोदले 'आपण असावे निवांत तरीच भेटे जगन्नाथ' या विषयावर बोलल्या. मुखोदगत पारायणकर्ते डॉ. गजानन खासनीस यांनी उपस्थितांना 'अभिषेकाचं महत्व' समजावून सांगितलं.

'श्रीगजानन अनुभव' पुस्तकाचे लेखक श्री जयंत वेलणकर यांनी या संमेलनाच्या निमित्ताने, महाराजांच्या प्रेरणेने एक विस्तृत लेख लिहिला 'गणी गण गणांत बोते'. लेख मोठा असल्याने या लेखाचं वाचन एक स्त्री प्रतिनिधी आणि पुरूष प्रतिनिधी अशा दोघांनी मिळून उपस्थित भक्तांसमोर सादर केलं. तेव्हा उपस्थित भक्तांनी 'गणी गण गणांत बोते' चा अर्थ सुलभ झाल्याचा आनंद व्यक्त केला.

संमेलनात गायन, भजन, पूजन, वादन, मनोरंजन अशा सर्व कार्यक्रमांसह गंभीर प्रकृतीचे, तात्विक विवेचन असे सर्व प्रकारचे कार्यक्रम झाल्यामुळे उपस्थित भक्त भारावून गेले.

कार्यक्रमात शेवटी कार्यकर्त्यांच्या विद्यामावशी, अर्थात सौ. विद्या उनवणे पडवळ म्हणजेच सौ. विद्याताई पडवळ यांचं ऑनलाईन श्री गजानन विजय ग्रंथाचं संपूर्ण मुखोदगत पारायण सादर झालं आणि तो संपूर्ण दिवस, श्री गजानन विजयमय होऊन गेला.

कार्यक्रमात भक्तांना ऑनलाईन मुंडगावच्या तसेच काचुर्ण्याच्या, पादुकांचंही दर्शन झालं. शेवटी जड अंतःकरणाने गजानन महाराजांचे भक्त संमेलन स्थळ सोडून जाण्यास निघाले तेव्हा विरहाच्या वेदना एकीकडे होत्या पण दोन गोड आठवणी ते सोबत घेऊन निघाले होते. आता वृत्त कथन करतोच आहे तर उल्लेख करूनच घेतो. त्यातील एक गोष्ट होती संमेलनातील मेनू. गुलाबजाम, जिलबी, आंब्याचा रस (अर्थात टीन) मोतीचूराचे लाडू, मोदक इत्यादी महाप्रसाद अगदी निशुल्क आणि दुसरी गोड गोष्ट होती, ज्याची गोडी अवीट आहे. ती म्हणजे शेगांवच्या माहेरापासून एवढ्या दूर प्रांतात, सातासमुद्रापलिकडे, समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराजांच्या भक्तांनी एकत्र येऊन अत्यंत भक्तीमय आणि प्रासादिक वातावरणात तल्लीन होऊन महाराजांचं नाव घेणं. त्यांचा जयजयकार करणं आणि म्हणणं. बोलो श्री गजानन महाराज की जय!






वृत्त कथन-- श्री काली बारी मंदिर शिकॅगो येथील गजानन महाराज सेवक.

या निमित्ताने अमेरिकेत स्थायिक असलेल्या गजानन महाराज भक्तांसाठी एक आनंदाची बातमी म्हणजे, आता गजानन महाराजांशी संबंधित विविध ग्रंथ साहित्य काली बारी मंदिरात उपलब्ध राहील व ते अमेरिकेत विविध राज्यात तेथून पाठविले जाईल. संबंधितांनी नोंद घ्यावी.

या शिवाय अमेरिकेतील गजानन महाराज भक्तांना अन्य माहिती हवी असल्यास ते पुढील ठिकाणी संपर्क साधू शकता. तुम्ही हा आनंदाचा सोहळा ऑनलाईन Chicago Kali Bari Facebook वर बघू शकता.

Please visit Chicago Kali Bari at following address and phone number:

Chicago Kali Bari

2S511 IL-53, Glen Ellyn, IL 60137

Phone number: (855) 525-4622

Email: info@ckb.org

।। श्री गजानन जय गजानन ।।

## परिस

सौ. आरती देशपांडे पुणे

गुरु परिस असता
सोने होईल जन्मता
नाही कशाची न्युनता
शेगावीचा योगीराजा ||१||

महती गावी गुरुची
त्याच्या अगाध लीलेची
देई शिकवण समतेची
शेगावीचा योगीराजा ||२||

कृपा दृष्टी ठेवी तो
नित्य भक्तांसी तारीतो
कधी न कोणा दुखवितो
शेगावीचा योगीराजा ||३||

त्याच्या भजनी रमावे
मुखी नाम राखावे
चरणामृत प्राशावे
शेगावीचा योगीराजा ||४||

फेरे जन्ममृत्यूचे चुकतील
मोक्षपदासी नेईल
ऐसा समर्थ क्षमाशील
शेगावीचा योगीराजा ||५||

अभक्तास देई भक्ती
नास्तीक वळवी युक्ती
मुमुक्षास प्रदानी मुक्ती
शेगावीचा योगीराज || ६ ||

बहुत जनाते सुखवी
पूण्यवंत चरणी ठेवी
वांछित रूप ते दावी
शेगाविचा योगिराज || ७ ||

म्हणे जना ते आरती
दुःखासी होय निवृत्ती
ब्रम्हमय पावी चित्तवृत्ती
चरणी या योगियाचे || ८ ||



|| श्री गजानन जय गजानन ||



For free circulation

# आर्ततेने गावे, ध्यान धरावे दत्तप्रभुचे

माधुरी ब्रह्मे-देशपांडे, विदर्भ



चेतना आपल्यास असते व्यापुन... हृदयात मुख्य स्थान तिचे... ती खेळतेय शरीरभर... ती निघुन गेली तर... तिच्याविणा आपण नुस्ते निष्प्राण कलेवर... तर या निकटतम शक्तिची वा चेतनेची जाणीव आपणास होतच नसते... ह्या चेतनशक्तिचे वा चैतन्याचे स्पष्ट नेमके रुप आपण जाणु शकत नाही... न जाणे कधीही...
[इथे सामान्यजन... पहिल्या पायरीवर असलेले अध्यात्म व्यक्ति मानलेले आहे... अधिकारी साधक वर्गांचा विचार नाही आहे इथे].

ह्या चैतन्यास... हृदयस्थ परमेशाला... जाणण्यास मग आपण काहीतरी करत राहतो... पुजाअर्चा... जपजाप्य, मंदीरदेवदर्शन, तिर्थयात्रा, ध्यानधारणा, तपाराधन, प्रदक्षिणा, यज्ञयाग, मौनसाधना... ही साधने गौण स्वरुपाची सामान्य साधकाचीं.

असामान्य साधक ध्यान धरीतो... आत्मसाक्षात्काराचे प्रमुख साधन म्हणजे ध्यान... मनातल्या भावानुरुप चितंन... साधक ज्याचे ध्यान धरेल. त्यात परिपक्वता आली की... त्या देवतेचे वायुमंडल ध्यानावस्थेत साधकात होते आविर्भूत... मग साधना होते सिद्ध... भाव दृढ होणे म्हणजेच ध्यान साधणे... ध्येय विषयाशी तद्रुपता प्राप्त होते... एकरुपत्व होणे तेवढ्या वेळपुरते...
[अस मला कधी ध्यान धरता येईल? जगदंब आईचे... ते तिचे तिस ठाऊके]

ज्याचे ध्यान धरावे तोच बनतो मग साधक... जी व्यक्ती आवडते त्याचे गुण दोष आपल्यातही प्रवेशतात... ते आपण नकळत व्यक्तिचिंतन ध्यान धरतो म्हणुनच न... अन म्हणुनच अवगुण न शिरो आत्म्यात... तर अन्य धारण न धरता... अनन्यशरणागत होऊन... त्या सर्वगुण संपन्न ईश्वरीचे/ईशाचे ध्यान करावे... प्रत्यक्ष प्रभु ध्यानधारण धरावे मग मानसहृदया...

पतीव्रता ध्यान धरी पतीचे
दिवसरातभर त्याचा विचार
पतीस्नेहे हृदय मन भारीले
त्याच्या साठी सारा आचार

मग नवमासातही असे हेच
पुत्र होई पितृमुख, पतीसम
ध्यानाचा हा परीणाम होई
देवासाठी करावी कृतीसम
-मधु-

पतंग दत्तगुरुच्या चोवीस गुरुपैकी एक... दिव्यावर झेप घेऊन मृत्युस आलिंगणारा... कोशकिटक भ्रमराचे चिंतन करत राहतो... अन मग भ्रमरच बनुन जातो... भ्रमर किड्याला कोषात टोचतो... त्याचा विचार केल्याने तो भ्रमर बनतो.

*भावितं तीव्रवेगेन यद्वस्तु निश्चयात्मना*
*पुमांस्तद्धि भवेच्छीघ्रं ज्ञेयं भ्रमरकीटवत्*

ज्या वस्तुचे व्यक्तिचे चिंतन केले जाते... त्या वस्तु व्यक्तिचा स्वभाव ताबडतोब उतरतो मनुष्यात... भ्रमर वा किटकाच्या दृष्टातांनुसार हे जाणुन घ्यावे अस ज्ञानेश्वर माऊली म्हणते.

दृढ निश्चयाने, एकाग्रतेने ध्यान केले पाहीजे... गुरुत्वाच्या साक्षात्कारासाठी साक्षात् श्रीगुरुचें वा आदिगुरु दत्तात्रेयप्रभुचे ध्यान धरीले पाहीजे... इतरा विषयांपासुन सुटका हवी तर.... ईशध्यान करावे... म्हणुनी महाराष्ट्री... मराठी माणुस किमान एक वा दोन वारृया तरी पंढरीरायासाठी करतो... सारकाही विसरुन... अन केवळ विठ्ठल विठ्ठल नामोच्चारे... पवित्र साधा सरळ गुणवान निष्कपट व्यक्ति बनुन जातो...

ध्यान धरावे त्या ध्यानाचे
त्या विटेवरच्या विठ्ठलाचे
मनातनाने वारकरी व्हावे
दरवर्षी नेमे वारीस जावे
-मधु-

खर नाही का हे... केवल विठ्ठलनाम घेऊन निर्मलमानस वागुन... लौकिक जीवनात कष्टकाम करतच... सच्चा वारकरी हे मिळवतो.

सदा आराध्याचेच ध्यान धरावे
संसारात अलिप्त विरक्त व्हावे
जन्ममरण संसारबंधना सुटावे
स्वरुप गुरुपायधुलीत मिळावे
-मधु-

ध्यान धरुन... आर्ततेने आईस आळवुन... सोबतच सर्वांशी साध, सरळ, निष्कपट, मधुर, अंहकार विरहीत वागुनच ईशप्राप्ती होणार... हे तो पक्के... ईशप्राप्तीची खटपट करताना.... पथ्य पाणी अत्यावश्यकच... होय न... अन त्यातही महत्वाचे म्हणजे... कोणाही जीवाचा न घडो मत्सर... आर्ततेने आता आळवुया... काहीतरी कणभर तरी ईशप्राप्तीसाठी करुया... तेही निष्कपट वागुनीया सा-याशी... होय ना.

आज आरती पाठवलीये... आर्ततेने म्हंटली जाणारी ती आरती... आता मात्र उच्चरवाने म्हंटली जाते... ती गोष्ट वेगळी... कुठेकुठे तर ओरडुनच... कि देवाने दचकावे एवढ्या मोठ्ठ्या आवाजात... मग आपण आळवुया आदिगुरुस अंत्यत भक्तिभावे... आर्ततेने... शांततेने.... मधुररवाने.

प्रेमभरे प्रार्थुया मग आदिगुरुस......

दत्ताई दे लेकरांकडे लक्ष... दुर्लक्ष नको करुस आई... दुर्मिळ दत्तरहस्य कळो कृपेने कृपाळुवां... कौतुकानं कौतुकलय तुला करुणानिधे... करुणामृत पाज आनंदमने... हो कृपावतं... कृतार्थ मानुन.... कृतकृत्य होऊन... कृतज्ञतेने नमुनीयां गाऊया दत्तगाणी...

कर्म अशुचित्व होनष्ट
सगुणसुदंर दर्शनरुप
नयनास दिसो त्रैमुर्ती
उजळो दत्तस्नेहदिप
-मधु

दत्तजंयती सप्ताह... आराधनेचा दिवस... आदिगुरु एकमुखी दत्तात्रेयप्रभुस दंडवत....

मागच्या जन्मीच्या राहीलेल्या आराधनेतुन या जन्मी मिळणारे गुरु दाखवतात वाट, पथ... अन लावतात माऊली च्या वात्सल्याने धर्ममार्गावर... प्रत्येकाच्या कुवतीनुसार, प्रारब्धानुसार मार्गदर्शन मिळणार... अन रस्ता तेवढ्या प्रमाणात निष्कटंक होणार... आपला जेवढा मगदुर तेवढी प्राप्ती

होणार... आपल्याच प्रगतीसाठी म्हणुनच प्रयत्न करायचे... तर आमची पायवाट सोपी होवु दे मायबापा... अन याच जन्मी तुझ्या पायधुलीत विलीन होवो मी... अशी प्रार्थना करुन आपल्या

श्रीगुरुराया ला अन आदिगुरु श्रीदत्तगुरुना आदरे, विनित, नम्र होवुन प्रणीपात ......

तर मग,

दत्तसप्ताहात श्रद्धाभावे
प्रार्थुया प्रेमभरे परमेशा

प्रचिती येवो अस्तित्वाची
हिच पल्लवीतशी आशा

तु एकमुखी संत गृहीचा
त्रिमुख मुर्ती परी हो बहु

तु अनादि अकळ अंम्हा
तुज आदिगुरु स्नेहे बाहु

संत वर्णे तुज भावे सदा
मग आम्हाही अनुकरण

तुज विनम्रे विनंती बापा
अनसुयापुत्रा अनुसरून

कधी वाचावे दत्तमहात्म्य
गुरुचरीत्र पठण प्रासादिक

रसाळ रंग रचित बावणी
इवलीशी वाचे सांसारिक

दत्तमालामंत्रे अनुष्ठान ते
कठीण अवघड करीती

दत्तआरती संध्यासमयी
कोणी सहजेच आचरती

कधी दुधपेला अर्पण करी
श्रीखंड तुज बहु आवडते

खडीसाखर प्रेमपुरीत ती
विनित भावे नैवेद्यास देते

जैसे जमेलसे तैसेते भक्त
तुज अपर्ण करी उपचार

तु घेवोनी अल्पस्वल्प ते
दो करे उंदड देशी उदार

तुज वंदुया वारंवारं दत्ता
दे चरणधुल एवढी कांक्षा

जन्मोजन्मी अजन्मा रे
गुरु भक्तीची रे आकांक्षा

तुज वंदुया वारंवारं दत्ता
दे चरणधुल एवढी कांक्षा
-मधु-

त्रितापहर त्रिगुणात्मक त्रिमुर्तीस... दयानिधी दयाघन दत्तात्रेय प्रभुस... भावभक्तिने... तुमच्या सर्वांसह... मधुचे दंडवत व नमन.

🌹🌿🌹🌿👣🕉👣🌿🌹🌿🌹

|| श्री गजानन जय गजानन ||

## गुरुपौर्णिमा virtual उत्सव

श्री गजानन महाराज भक्त परिवार, USA

२०२० चे संपूर्ण वर्ष COVID-19 च्या सावटाखाली गेले, त्यामुळे त्या वर्षी लहान मुलांच्या कोणत्याच activities झाल्या नाहीत. श्री गजानन माउलींच्या कृपाशीर्वादाने 'श्री गजानन महाराज भक्त परिवार, USA' ने गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने २०२१ मध्ये 'गुरुपौर्णिमा virtual उत्सव' हा आगळा वेगळा उपक्रम आयोजित केला. परिवारातील ३६ मुलांना 'गुरु' ह्या विषयावर त्यांच्या वयाला योग्य असा एखादा श्लोक किंवा एखादी गोष्ट लिहून दिली व पाठ करायला सांगितली. रोज एक किंवा दोन मुले त्यांना लिहून दिलेला श्लोक किंवा गोष्ट म्हणून दाखवत असतानाचा विडिओ परिवाराच्या यूट्यूब चॅनेल वर प्रसारित केला जात असे. सर्व मुलांनी अणि त्यांच्या पालकांनी ह्या उपक्रमासाठी खूप कष्ट घेतले आणि उत्तम सादरीकरण केले.

परिवारातील सेवेकरी भगिनींनी ह्या गोष्टी आणि श्लोक इंटरनेट वरुन, काही पुस्तके वाचून आणि त्यांच्या माहितीतून शोधले आणि script मध्ये लिहिले. गोष्टी लिहिताना त्या कोणत्या वयाच्या मुलांसाठी योग्य ठरतील किंवा त्या गोष्टींचा मुलांवर काही विपरित परिणाम तर होणार नाही ना, ह्याचा विचार केला. मुलांनी प्रत्येक गोष्टीच्या शेवटी त्या गोष्टीचे तात्पर्य सांगितले. मुलांना आणि त्यांच्या पालकांना विडिओ कसा असावा, बोलण्यातील चढ उतार कसे असावे ह्याचे मार्गदर्शन केले. YouTube चॅनेल वर विडिओ ठराविक वेळेतच प्रकाशित केला जात असे आणि तो प्रसारित झाला की त्याची लिंक परिवाराच्या WhatsApp ग्रुप वर टाकली जात असे.

रोज साधारण दुपारी २ वाजता नविन विडिओ येण्याची सर्व जण उत्सुकतेने वाट पहात असायचे. आज मुले काय नवीन सादर करणार ह्याची उत्कंठा मनात दाटून यायची. श्लोक आणि त्याचा मुलांना समजेल असा अर्थ त्या लहानग्या मुलांच्या तोंडून ऐकण्याची मजाच न्यारी होती. गोष्ट सांगताना किंवा म्हणताना होणारे मुलांचे लोभस हावभाव तर पाहतच रहावेसे वाटायचे. रोज ह्या मुलांमुळे श्रोत्यांच्याही ज्ञानात भर पडायची. जुन्या ऐकलेल्या पण आता मनाच्या कोणत्या तरी कोपऱ्यात दडून बसलेल्या गोष्टींना पुन्हा उजाळा मिळायचा. अनेक ऋषीतुल्य संतांच्या गोष्टी आणि संत वाङ्मयाचे असंख्य पैलू ह्या उपक्रमामुळे श्रोत्यांपर्यंत पोचले.

आपल्या संतांनी सद्गुरुंची उपासना कशी केली हे पाहिल्यावर कुठे तरी मनात आपली आपल्यालाच लाज वाटते. आपण फक्त प्रपंचासाठीच मागणे मागत असतो. सद्गुरु आपल्याला त्यापेक्षा खूप जास्त द्यायला बसले आहेत ह्याची जाणीवसुद्धा आपल्याला नसते. श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज म्हणत असत की, "मी इथे कस्तूरी द्यायला बसलो आहे. पण इथे येणारे सगळेच हिंग जिऱ्याचे गिऱ्हाईक आहेत. कोणालाच ही निष्काम भक्ति रूपी कस्तूरी नको आहे." आपले अगदी तसेच होते. आपल्या आयुष्यात संतांचे काय स्थान असायला हवे आणि ते तसे आहे का, ह्याचे आत्मपरिक्षण आपण सर्वांनीच करण्याची गरज आहे.

असो! बघता बघता हा मंतरलेला महिना सरला. वटपौर्णिमेला सुरु झालेल्या ह्या उपक्रमाची गुरुपौर्णिमेला सांगता झाली. बालगोपाळांनी हा महिना अक्षरश: गाजवला! सर्व लहानग्यांचे आणि त्यांच्या पालकांचे मनापासून अभिनंदन. श्री महाराजांनी सगळ्यांकडून उत्तमच काम करून घेतले. श्री महाराजांच्या चरणी आपली ही सेवा रुजू व्हावी ह्यापेक्षा मोठी भाग्याची गोष्ट ती काय.

सर्व विडिओ 'श्री गजानन महाराज भक्त परिवार, USA' च्या खालील लिंकवर उपलब्ध आहेत.

https://youtube.com/channel/UCNrJWmClJ6spLpwmLDyq2iA

समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराज की जय!



|| श्री गजानन जय गजानन ||

## मागणे

सौ श्रावणी सामंत, बोरिवली, मुंबई

मागणे हे हेची आता
तुज पासी बा गजानना
नित्य वसो तू हृदयाशी बा
कृपा सागरा पुरुषोत्तमा. ||१||

अखंड चिंतन तुझिया नामी
मनी रंगो दयाघना
सन्मार्गाने सदैव न्यावे
त्रिकालन्या गजानना. ||२||

सत्कर्माचा यज्ञ घडावा
झिजवूनी हा देह खरा
अनन्यभावे येवो शरणी
पुण्यापुरूषा गजानना. ||३||

पावन करुनी घ्या हो मजला
तुझिया चरणी दीनानाथा
जन्म मृत्यूच्यां फेऱ्यामधूनी
मुक्ती द्यावी कृपानाथा. ||४||

|| श्री गजानन जय गजानन ||

## Kids Quiz

Veena, Seattle.



1. In which city did Gajanan Maharaj appear?

A. Nagpur B. Mumbai

C. Shegaon D. Nashik

2. What is Gajanan Maharaj's favorite food?

A. Daal & Rice B. Zhunka Bhakri

C. Fruit Salad D. Puran Poli

3. Who took Maharaj Home for the first time?

A. Dasganu Maharaj B. Hari Patil

C. Bankatlal D. Shivaji Raje

4. Complete the Mantra

Gan Gan ________ ________

5. Who is Mother of Datta Maharaj?

A. Parvati B. Anusuya

C. Laxshmi D. Saraswati

6. Lord Ram is the incarnation of?

A. Lord Shankar B. Lord Bramha

C. Lord Vishnu D. Lord Ganpati

7. Who is the Goddess of Knowledge?

A. Goddess Durga B. Goddess Laxshmi

C. Goddess Parvathi

D. Goddess Saraswati

8. Where was Lord Ram Born?

A. Kashi B. Mathura

C. Ayodha D. Lanka

9. Where was Gajanan Maharaj found sitting for the first time?

A. Under a Banyan Tree B. Near a River

C. In a temple D. In a Palace

10. What is the most important teaching of Gajanan Maharaj?

A. Eat lots of food

B. Drink lots of water

C. Don’t waste food

D. Wake up early in the morning

11. Which River came to meet Gajanan Maharaj?

A. Ganga B. Narmada

C. Yamuna D. Godavari

12. Who freed Ahalya, wife of sage Gautama from her curse?

A. Lord Krishna.

B. Lord Rama.

C. Lord Brahma.

D. Lord Shiva.

13. How many avatars of Vishnu are believed to have come down to Earth so far?

A. Ten B. Nine

C. Eight D. Seven

14. Where did Sai Baba live?

A. Shirdi B. Pune

C. Seattle d. Kolhapur

15. What two things Sai Baba asked his devotees to follow?

A. Shraddha & Saburi B. Shraddha & Sama

C. Daya & Shanti D. Bhakti & Shakti



।। श्री गजानन जय गजानन ।।

## भावभक्ती शिवाय सद्गुरू काही मागत नाही

सौ. अपर्णा जोशी, पुणे

भावभक्ती शिवाय सद्गुरू
कधीच काही मागत नाही
मस्तक झुकता जुळतात कर
तिथे अवडंबर लागत नाही ।।

पारिजातकाच्या रांगोळ्यांनी
वसुंधरा ज्यांचे करते स्वागत
पाद प्रक्षालनास दव तृण ही
स्वतः पुढे येतात वाकत ।।

पक्ष्यांच्या मधुर कलारवाने
होते गजानन मंगल गान
त्यांच्या पूनीत पदस्पर्शाने
चराचरात येई त्राण ।।

भक्तांचे ह्रदयंच सिद्ध
होते सद्गुरुंचे सिंहासन
जिव्हा ही मौन होते
मनात चालते संभाषण ।।

आसनस्थ होता सद्गुरू

सृष्टीत पसरे हर्षोल्लास
गुलाब मोगरा कल्पतरू
आतुरतात पुष्प वर्षावास ।।

पूर्वेच्या कोवळ्या किरणांनी
होते गुरुमुख ओवाळणी
बेल, दुर्वा, तुळस संगे
कंठी शोभे रुद्राक्ष मणी ।।

अभिषेकां ओघळते अश्रु
मुखे स्तुतीस धावतात पद्य
मनातील भक्ती भावनांचा
तेव्हां होतो नैवेद्य ।।

तारकांनी सजला आकाश
होतो त्यांचा भरजरी शैला
जिथे गजानन, तिथेच भरतो
भक्तांच्या भक्तीचा मेळा ।।

तेजोवलय गजाननाचे
दूर सारते अंधारत्व
सूर्य चंद्र नयन होऊनी
दावी जगी एकच तत्व ।।

त्रिभुवन ही तुझीच माया
तूच ब्रह्मा, विष्णू, महेशा
नमो त्रिगुणात्मक, गजानना
अवलिया, अवधूता, परेशा ।।

दर्शन होता असे गोजिरे
उद्धरितो अपराधी
मिठी मारता पदकमले
साधकास साधे, दिव्य समाधी ।।



।। श्री गजानन जय गजानन ।।


For free circulation

## श्री नवनाथ स्तवन

रोहन मेहता, सियाटल

जयजयाजी मच्छिंद्रनाथा । कठोर तप आचरीता ।
त्रिमूर्तीची दीक्षा घेता । नाथ पंथ आरंभिला ॥१॥

जयजयाजी गोरक्षनाथा । उकीरड्यातूनी जन्म घेता ।
चैतन्यरुपी राहून सर्वथा । तत्पर रक्षिण्या भक्ता ॥२॥

जयजयाजी जालंदरनाथा । यज्ञकुंडात प्रकटता ।
बारा वर्षे गर्तेत राहता । फिरून आशिर्वाद सर्वांसी ॥३॥

जयजयाजी कानिफनाथा । गजकर्णातून अवतरता ।
असीम गुरुभक्ती साधता । वंद्य सर्वांसी जाहलात ॥४॥

जयजयाजी गहिनीनाथा । मातीसी आणिली सजीवता ।
निवृत्तिनाथांचे गुरु होता । नाथपंथ आचरीला ॥५॥

जयजयाजी भर्तरीनाथा । गोरक्ष झाला संशय फेडता ।
नाथपंथ हाती घेता । अनेक लोक उद्धरिले ॥६॥

जयजयाजी रेवणनाथा । नर्मदा काठी प्रथम दिसता ।
मृत शरीर उठवता । लीला अपार मांडिल्या ॥७॥

जयजयाजी नागनाथा । वटवृक्षी अंड्यातून येता ।
दत्तात्रेयाच्या दर्शनाकरीता । सिद्धींनी गांवजेवण घातले ॥८॥

जयजयाजी चर्पटनाथा । भागीरथी तिरी अवतरता ।
सामर्थ्य आपुले वर्णिता । निःशब्द जाहलो ॥९॥

नवनाथांचे स्मरण करुनी । प्रेमफुलांचा हार गुंफूनी ।
भावभक्तीचा नैवेद्य अर्पूनी । घालू साष्टांग दंडवता ॥१०॥

🌹🌿🌹🌿👣🕉👣🌿🌹🌿🌹

।। श्री गजानन जय गजानन ।।

## ।। श्री गुरूंचे गाणे ।।

कै. निर्मला देशपांडे

संकलन: सुमेधा जोशी (नात)

अरे ह्या झोपडीत आहे तरी काय
सहज देखिले सद्गुरू पाय ।। ध्रु. ।।

उंच हवेल्या बांधुनी मजले
विषय सुखात रंगुनी गेले
शाश्वत सुखाला विसरुनी जाय ।। १।। अरे...

काम क्रोधाचा झाडा केला
आशातृष्णेला बांध घातला
हृदयात साठविले सद्गुरू पाय ।। २ ।। अरे...

माझ्यावरी उपकार केला
सुख दुःखाचा विसर पडला
नित्य आठविते सद्गुरू पाय ।। ३ ।। अरे...

Dear devotee brothers and sisters,

It is our greatest pleasure to bring to you this special issue of the e-magazine, "Gajanan-Gunjan". The sole purpose of this magazine is to enhance and enrich understanding and devotion towards Shree Gajanan Maharaj, Shegaon. We are extremely delighted to present a wide variety of intellectual contributions. We wish to extend a big thank you to all the contributors.

PLEASE continue sending in your all - small and big – contributions, as and when you can, so that we can plan our future issues in advance. Send in your writings as well as suggestions for improvement if any by e-mail to gajanangunjan@gmail.com

YOUR contributions may encompass one or more of, but not limited to, the following topics:
1) Stories or articles related to Maharaj's life, leelas (pastimes) and worship
2) Devotee's experiences
3) Thanksgiving for Mauli's help
4) Poems/ Songs/ Bhajans/ Prayers
5) Paintings/ Sketches/ Photos/ Rangoli pictures
6) Memorable Shegaon yatras
7) Devotees guide on Parayan, Shegaon visits, Japa, day-to-day dealings etc.
8) Memoirs on great devotees of Maharaj
9) Food offerings (recipes for Prasad)
10) Various seva ideas and services offered
11) Articles, bhajans, prayers about the Lord, Guru, Avataras, and their pastimes
12) Experiences with contemporary Saints, Guru or Avataras of Lord.

FINALLY, we wish to acknowledge gratefully the original sources of (Internet, WhatsApp, published books, or otherwise) the various pictures and works used in this e-magazine. They are used or referred to enhance the presentation of the contributions by various devotees. Citations are not given explicitly because the first original source of any content couldn't be validated, and hence, this general acknowledgement. Thanks, and Jai Gajanan!

This e-magazine is meant for FREE CIRCULATION only, without any monetary or commercial motive, and every content shall be treated the same way. This e-magazine respects the views, compilations, beliefs, and understandings of every contributor expressed in their compositions presented herein, how much ever diverse they may be. It takes no responsibility for the correctness of any information provided by any contributor.

|| श्री गजानन जय गजानन ||



अहमदाबाद मंदिरामधील

श्री दत्तप्रभू, श्री स्वामी समर्थ, श्री गजानन महाराज आणि श्री साईनाथ महाराज यांच्या सुंदर मूर्तींचे दर्शन

सौजन्य श्री शैलेश देशकर